**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२५/सूचना/५०१ दिनांक-०७/११/२०२५

**सुचना**

**चौथ्या प्रवेश फेरीसाठी (Spot Round) पसंतीक्रम भरलेल्या विद्यार्थीनींची यादी प्रसिध्द करणे तसेच पुढील प्रवेश फेरीकरिता सूचना.**

सन २०२५-२६ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा पार पडली असून लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीअंती प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी गुणवत्ता व विद्यार्थ्यांनी दिलेला पसंतीक्रम विचारात घेऊन प्रथम प्रवेश यादी, दुसरी प्रवेश यादी व तिसरी प्रवेश यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

चौथ्या प्रवेश फेरीतील (Spot Round) प्रवेशासाठी संस्थानिहाय रिक्त जागांची संवर्गनिहाय यादी दि.०४.११.२०२५ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीतील विद्यार्थ्यांना दि.०५.११.२०२५ व ०६.११.२०२५ या दोन दिवशी पसंतीक्रम भरण्याकरिता लिंक उपलब्ध करून देण्यात आली.

सदर चौथ्या प्रत्यक्ष फेरीमध्ये केवळ महिला उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने चौथ्या फेरीसाठी संस्थानिहाय पसंतीक्रम भरलेल्या विद्यार्थीनींची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीतील विद्यार्थीनींनी दि.११.११.२०२५ रोजी मिळालेल्या संस्थेत उपस्थित रहावे. सुधारित वेळापत्रकानूसार दि.११.११.२०२५ रोजी दु.०२.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थीनींची उपस्थिती नोंदविण्यात येईल.

सदर चौथ्या प्रत्यक्ष फेरीमध्ये रिक्त राहणाऱ्या जागांकरिता पाचवी प्रत्यक्ष फेरी राबविण्यात येईल. पाचव्या प्रत्यक्ष (Spot Round) फेरीमध्ये गुणवत्ताक्रम व जातप्रवर्गानूसार प्रवेश देण्यात येतील. चौथ्या प्रत्यक्ष फेरीमध्ये रिक्त राहणाऱ्या जागांच्या अनुषंगाने पाचव्या फेरीबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे या केंद्रासाठी प्राधान्यक्रम भरलेल्या विद्यार्थ्यांनी (यादीत नाव नमूद असलेले) दि.११.११.२०२५ रोजी यशदा, पुणे या संस्थेत उपस्थित रहावे. सदर ठिकाणी यादीतील सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे.

सोबत-
१.चौथ्या प्रत्यक्ष फेरीकरिता प्रसिध्द करावयाची यादी.
२.चौथ्या प्रत्यक्ष फेरीकरिता प्रसिध्द करावयाची यशदा, पुणे करिता स्वतंत्र यादी.

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**

प्रत- १.सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापुर, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर
२. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे व ३. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित, सावित्रीबाई फुले अकॅडमी, पुणे